केंद्र पुरस्कृत कृषि उन्नती योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - या योजनेंतर्गत वाणिज्यिक पिके, कापूस करिता निधी वितरीत करणेबाबत.
(लेखाशिर्ष २४०१ अे५७५) (केंद्र हिस्सा) व (लेखाशिर्ष २४०१ अे५८४) (राज्य हिस्सा)

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१८/ प्र.क्र.११/ कार्यासन ६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: २२ मार्च, २०१९.

वाचा -

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८ /प्र.क्र.६९ / अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९
२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग समक्रमांक दि.३.०७.२०१८
३) कृषि व पदुम विभागाची नस्ती क्र. असुअ-२०१८ / प्र. क्र.७९/ ४-अे.

शासन निर्णय-

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - वाणिज्यिक पिके (कापूस व ऊस) अंतर्गत मागणी क्र. टी-५, २४०१ पीक संवर्धन, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) आदिवासी उपयोजनेंतर्गत योजना, (०१) (२३) कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके - कापूस (केंद्र हिस्सा) (२४०१ A५७५), ३३- अर्थसहाय्य खाली रु. ६.३५ लाख तर त्यास समरुप राज्य हिश्याकरिता (०१) (२४) कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके - कापूस (राज्य हिस्सा) (२४०१ A५८४) याखाली रु. ४.२३ लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. सदर तरतुदीतून कापूस (केंद्र हिस्सा) (२४०१ A५७५), ३३- अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली रु.६.३५ लाख तसेच कापूस (राज्य हिस्सा) (२४०१ A५८४) या लेखाशिर्षाखाली रु. ४.२३ लाख इतका निधी संदर्भीत क्र.२ येथे नमूद शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला आहे.

२. कृषि व पदुम विभागाच्या वाचा क्र. ३ येथील प्रस्तावास अनुसरुन उपरोक्त योजनेकरीता कापूस (केंद्र हिस्सा) (२४०१ A५७५), ३३- अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली रु.७.४७ लाख तसेच कापूस (राज्य हिस्सा) (२४०१ A५८४) या लेखाशिर्षाखाली रु. ४.९८ लाख असा एकूण रु.१२.४५ लाख (अक्षरी रुपये बारा लाख, पंचेचाळीस हजार फक्त) इतका निधी अनुक्रमे लेखाशिर्ष (२४०१ A५५७) (केंद्र हिस्सा) व लेखाशिर्ष (२४०१ A५६६) (राज्य हिस्सा) या लेखाशिर्षाखालील बचतीमधून पुनर्विनियोजनाद्वारे प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून सचिव (कृषी), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना खालीलप्रमाणे अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

(रु.लाखात)

लेखाशिर्ष	सन २०१८-१९ या वर्षाचा वितरीत करावयाचा राहीलेला निधी	सन २०१५-१६, २०१७-१८ या वर्षाचा अखर्चित व केंद्र शासनाने पुनर्जिवित केलेला निधी	एकूण वितरीत करावयाचा निधी
(२४०१ A५७५) (केंद्र हिस्सा)	१.३३	६.१४	७.४७
(२४०१ A५८४) (राज्य हिस्सा)	०.८९	४.०९	४.९८

३. सदर निधी अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. प्रकरणी विभागप्रमुख /नियंत्रण अधिकारी यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

४. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

५. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र.६३/ व्यय-१, दि. १८.०२.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१८१२०१२३४२२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Kisanrao Pawar

Digitally signed by Kiran Kisanrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=68d8b19f123ba59448c0926a91296205b9a87463f831a2beea0be5cb381a34e8, serialNumber=344de3ff07b9439dd11caf728255a5eb0a0dd495ef82f989931088637d8211c0, cn=Kiran Kisanrao Pawar
Date: 2019.03.22 12:10:51 +05'30'

(किरण कि.पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.
५. वित्त विभाग (अर्थसंकल्प- १९/व्यय १/व्यय ५ /व्यय १४), मंत्रालय, मुंबई.
६. कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई.

७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा मजला, विधानभवन, मुंबई.

८. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

९. कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

१०. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग